सध्या कॉम्प्युटरच्या साहाय्याने रेडिओथेरपी यंत्रे जशी: थ्री डायमेंशनल रेडिओथेरपी (3 D CRT), इंटेन्सिटि-मॉड्युलेटेड रेडिएशन थेरपी (IMRT) तसेच सायबर चाकू (Cyber Knife) चा उपयोग करुन फक्त गाठीवर लक्ष केंद्रित केले जाते, ज्यामुळे आजुबाजूच्या पेशींवर त्याचा दुष्परिणाम अगदी कमी प्रमाणात होतो.

**शल्यक्रिया (Surgery)** : ही सर्वात प्रचलित असलेली कॅन्सर उपचारपध्दती आहे, ज्यामध्ये डॉक्टर गाठ काढून टाकतात. सर्व्हायकल कॅन्सरमध्ये डॉक्टर गर्भाशय मुख (Cervix), गर्भाशय, योनीचा काही भाग तसेच आजूबाजूच्या दूषित पेशी व संबंधीत लिम्फनोडस्ना काढून टाकतात.

**केमोथेरपी** : ह्या उपचारपध्दती मध्ये औषधे देऊन शरीरात झपाटयाने वाढणाऱ्या कॅन्सर पेशींचा नाश केला जातो. सर्व्हायकल कॅन्सरमध्ये बहुधा केमोथेरपी, रेडिएशन बरोबर दिली जाते. जर हा रोग पुढच्या स्टेज (Advance Stage) मध्ये असेल तर केमोथेरपीचा उपयोग केला जातो.

जर तुम्हाला रेडिएशन तसेच केमोथेरपीबद्दल सविस्तर माहिती हवी असेल तर सीपीएएशी (CPAA) संपर्क साधा. (ह्या पुस्तिका भिन्न भाषांमध्येही उपलब्ध आहेत) किंवा “information@cancer.org.in” च्या ई मेलवर लिहून आपली प्रत मागून घ्या.

**नंतर घेण्याची काळजी**

नियमित तपासणी : शारीरिक तपासणी, पॅप स्मिअर टेस्ट, अल्ट्रासाऊंड टेस्ट, तसेच अन्य प्रयोगशाळेतल्या तपासण्या करुन घेणे फार जरुरी आहे. डॉक्टर रुग्णाला प्रत्येक ३,६,१२ महिन्यानी तपासणीसाठी बोलावतात आणि त्यानंतर काही वर्षानंतर, ज्यामुळे ह्या कॅन्सरची लागण पुन्हा होण्याची शक्तता कमी होते.

**सर्व्हायकल कॅन्सर लस (Vaccine)**

शास्त्रज्ञानी सर्व्हायकल कॅन्सर साठी लस शोधून काढली आहे. HPV व्हायरसमुळे सर्व प्रकारच्या सर्व्हायकल कॅन्सरची लागण लागते. सामान्यपणे स्त्रियांनी स्त्री पुरुष समागमाची सुरुवात होण्याअगोदर किंवा ह्या व्हायरसची लागण लागायच्या आत ही लस (Vaccine) टोचून घेतली पाहिजे. नियमितपणे वयाच्या ११ वर्षानंतर ही लस टोचून घेण्याचा सल्ला दिला जातो.

**आभारी : डॉ. प्रशांत न्याती**
कन्सल्टंट गायनाकॉलॉजिस्ट, अंको - सर्जन
फोर्टिस - वाशी व ज्युपिटर हॉस्पिटल

**Cancer Patients Aid Association**
TOTAL MANAGEMENT OF CANCER
Anand Niketan, King George V. Memorial, Dr. E. Moses Road,
Mahalakshmi, Mumbai, MH, India - 400 011
Tel : +91 22 2492 4000 / Fax : +91 22 2497 3599
e-mail : webmaster@cancer.org.in • website : www.cancer.org.in

# गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग

CANCER PATIENTS AID ASSOCIATION
Total Management of Cancer
www.cancer.org.in

## गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग (Cervical Cancer)

भारतातल्या स्त्रियांमध्ये ह्या प्रकारचा कर्करोग सर्वात जास्त प्रमाणात आढळून येतो. विशेषकरुन ग्रामीण भागात दरवर्षी जवळपास १ लाखावर महिलांत हा कर्करोग आढळून येतो. गर्भाशयाच्या मुखाचा रस्ता योनिमार्गातून जाऊन शरीराच्या बाहेर पडतो. कर्करोग हा जरुरी नसलेल्या, कार्यहीन व अनिर्बंध वाढत असलेल्या पेशींचा पुंजका असतो, जो शरीराच्या इतर भागात पसरु शकतो. बहुतेक सर्व्हायकल कॅन्सरची सुरुवात गर्भाशयाच्या मुखाजवळच्या अस्तरातील स्नायूपेशी मधून होते. ह्या पेशी लगेच कॅन्सरमध्ये बदलत नाहीत. साधारण पेशींना कर्करोगाच्या पेशीजालामध्ये बदलण्यास सुमारे एकदशकाचा कालावधी लागतो. एका साध्याश्या चाचणीतून




ज्याला पॅप टेस्ट (PAP TEST) म्हणतात, त्यातून ह्या पेशीमधला फरक शोधून काढता येतो. त्यामुळे हे पेशीजाल कर्करोगात बदलण्याआधी त्यावर उपचाराद्वारे प्रतिबंध घालता येतो.

### सर्व्हायकल कॅन्सर होण्यासाठी धोके कोणते ?

शास्त्रज्ञानी खालील गोष्टीमुळे ह्या प्रकारचा कॅन्सर होण्याचा धोका असतो असे शोधून काढले आहे;

- १८ वर्षाखालील स्त्रियांनी समागमास सुरुवात केल्यास.
- दोन किंवा अधिक पुरुषांबरोबर लैंगिक संबंध ठेवल्यास किंवा ज्या पुरुषाशी संबंध ठेवला आहे त्याचा दोन किंवा अधिक स्त्रियांशी संबंध आहे.
- लवकर लग्न व मूल होणे.
- चार किंवा जास्त मुले होणे.
- अतिशय सुमार दर्जाची आरोग्य विषयक काळजी.
- तंबाखू किंवा तत्सम वापर.
- संसर्गास विरोध करण्याची अपुरी शारीरिक क्षमता.

ह्यामधले सर्वात महत्वाचे कारण ज्याने HPV लागण लागून सर्व्हायकल कॅन्सर होण्याचा धोका असतो, तो म्हणजे दोन किंवा अधिक पुरुषांबरोबर संबंध किंवा दोन किंवा अधिक स्त्रियांशी संबंध असलेल्या पुरुषाशी संबंध ठेवणे.

### सर्व्हायकल कॅन्सरची लक्षणे :

अगदी सुरुवातीला हा कर्करोग कुठलीही नजरेत येणारी लक्षणे दाखवत नाही, त्यामुळे उघडकीस येत नाही. परंतु पॅप स्मिअर टेस्ट (Pap Smear Test) जर केली तर उघडकीस येऊ शकतो.

ह्या कर्करोगाची पुढील काळातली (Advance Stage) काही लक्षणे :

- समागमानंतर रक्तस्त्राव
- मासिकपाळी नंतर किंवा आधी रक्तस्त्राव
- अतिशय जास्त पांढरा स्त्राव धुपणी/प्रदर (Leucorrhea) व त्या बरोबर घाणेरडा वास येणे.
- मासिकपाळी बंद (Menopause) झाल्यावर रक्तस्त्राव

### सर्व्हायकल कॅन्सरचे निदान :

जर वरीलपैकी कोणतेही लक्षण आढळल्यास स्त्रीरोगतज्ञाची त्वरित भेट घ्या. आपली सर्व माहिती विचारात घेऊन डॉक्टर गर्भाशयमुख व योनिमार्गाची आतून तपासणी करुन काही रोगजंतूनी केलेला संसर्ग (Infection), अनियमित पेशीजाल, व्रण किंवा वाढ आहे का ह्याची तपासणी करतात. त्यानंतर पॅप स्मिअर टेस्ट केली जाते. ह्या टेस्टच्या परिणामानुसार पुढील तपासण्या करण्याच सल्ला दिला जातो, जसे CT स्कॅन, MRI, PET स्कॅन वगैरे.

### पॅप स्मिअर : (Pap Smear)

पॅप स्मिअर टेस्ट ही अगदी सोपी, स्वस्त आणि वेदनाविरहीत असून डॉक्टरच्या कन्स्लटिंग रुम मध्ये करु शकतो, ज्यामुळे कॅन्सरचे प्रारंभिक स्वरुप कळू शकते. गर्भमूखातील पेशींना एका काचेच्या स्लाइड (Slide) वर घेऊन तपासणीला (Cytologist) कडे पाठवले जाते. प्रत्येक स्त्री जी लैंगिक क्रियेशी संबंधीत असते, त्यांनी सुरुवातीला पॅप स्मिअर टेस्ट करुन घेणे आवश्यक असते. जरी काही तक्रार नसली, तरी दर तीन वर्षानी एकदा ही टेस्ट करुन घ्यावी. जर काही संशयास्पद लक्षणे दिसली, तर त्वरित तपासणी आवश्यक आहे.

### कॉल्पोस्कोपी : (Colposcopy)

पॅप स्मिअर टेस्ट जर अनियमित पेशींची वाढ दाखवत असेल, तसेच तपासणी करताना जर रचनात्मक बिघाड सर्व्हिक्समध्ये दिसत नसेल तर ''कॉल्पोस्कोपी पध्दति'' सर्वसाधारणपणे वापरली जाते. कॉल्पोस्कोपी पध्दति स्कॅलपेल (Scalpel) लेसर (Laser) किंवा इलेक्ट्रोसर्जिकल लूपद्वारे केली जाते (Leep) व गर्भमुखाचा एक छोटा तुकडा काढला जातो. ह्या कार्यपध्दतीने डॉक्टरना कुठल्याप्रकारची जखम किंवा बिघाड व ती कितपत खोल आहे हे कळू शकते आणि त्या प्रमाणे उपचार पध्दतीचा अवलंब करता येतो. तसेच अनियमित भाग कापून काढता येतो.

### लवकर शोध :

सर्व स्त्रियांनी जर ओटीपोटाची तपासणी (Pelvic Exam) तसेच पॅप टेस्ट वेळोवेळी करुन घेतली, तर कॅन्सरच्या प्रारंभिक स्थितीचा शोध लगेच म्हणजे ३ वर्ष आधी कळेल व उपचार चालू करुन कॅन्सर होण्याचा धोका टळू शकेल. ह्या मुळे रोगाची सुरुवात व्हायच्या आत उपचार करुन बरा होण्याजोग्या स्थितीत कॅन्सरवर मात करता येईल.

### सर्व्हायकल कॅन्सरचा उपचार :

उपचार हा बऱ्याच गोष्टींवर अवलंबून असतो, जसे: वय, गाठीची जागा व आकारमान, रोगाची स्थिती (Stage) तसेच रुग्णाची सर्वसाधारण प्रकृति, कॅन्सरची इतर भागात लागण तर नाही लागली हे जाणून घेणे महत्वाचे असते व लागण लागली असेल तर कुठपर्यंत लागली, हे ही विचारात घेणे जरुरी आहे. साधारणपणे तीन उपचार पध्दतींचा अवलंब करतात, ती म्हणजे रेडिएशन थेरपी, ऑपरेशन व केमोथेरपी.

### रेडिएशन थेरपी :

ह्या मध्ये कॅन्सर पसरलेल्या जागेवर रेडिएशन देऊन त्यांचा नाश केला जातो, व त्यामुळे त्याची अनियमित वाढ होणे थांबले जाते. ही उपचार पध्दती साधारण एक महिन्याची असते, ज्यामध्ये ठराविक रेडिएशनची मात्रा रोज दिली जाते. जेव्हा गाठ नष्ट केली जाते, तेव्हा नियमित (Normal) तसेच अनियमित (Abnormal) पेशींवर ही त्याचा परिणाम होतो.

रेडिएशन उपचार ही बाह्यरुग्ण पध्दती आहे (रुग्णाला हॉस्पिटलमध्ये राहाण्याची गरज नसते). ही पध्दती साधारणपणे एक्स रे काढण्यासारखी असते, ज्याला काही सेकंद ते कित्येक मिनिटे लागतात.

### सर्व्हायकल कॅन्सर बरा करण्यासाठी पुढील रेडिएशन पध्दतीचा वापर केला जातो :

- ब्रॅकी थेरपी (Brachytherapy) : ह्यामध्ये रेडिएशन थेट शरीराच्या भागावर सुई किंवा वायरर्सने देतात.
- टेलेथेरपी (Teletheraphy) : ह्यामध्ये रेडिएशन देणाऱ्या यंत्राचा उपयोग, जसे CT Scan किंवा एक्स रे मशीन प्रमाणे केला जातो.
- काही रुग्णामध्ये केमोथेरपीचा ही उपयोग रेडिएशन उपचाराबरोबर केला जातो, ज्यामुळे तो अधिक परिणामकारक ठरतो.